जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ५१७ दिनांक - ०७/१२/२०२४**

दरोडा व वाहनचोरी विरोधी पथक १, गुन्हे शाखा, पुणे शहर

## दुचाकी चोरणा-या आरोपीकडुन ०२ दुचाकी गाडया जप्त

दि. ०६/१२/२०२४ रोजी दरोडा व वाहनचोरी विरोधी पथक १ कडील पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार असे बंडगार्डन पोलीस स्टेशन, गुन्हा रजि नं ३५७/२०२४, भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२) या गुन्हयातील अज्ञात आरोपीताचा व चोरीस गेले दुचाकी गाडीचा शोध घेत असताना पोलीस अंमलदार रविंद्र लोखंडे यांना त्यांचे गोपनीय बातमीदारामार्फेतीने बातमी मिळाली की, **बबन सिताराम शिर्के वय ४१ वर्षे रा.शिक्रापुर पुणे** हा मालधक्का चौकाकडुन पुणे स्टेशनकडे जाणाऱ्या सार्वजनिक रोडच्या कडेला फुटपाथलगत वरील नमुद गुन्हयातील चोरीचे दुचाकी गाडीसह उभा असलेबाबतची खात्रीशीर बातमी मिळाली

सदर ठिकाणी जावुन सापळा रचुन नमुद आरोपीचे ताब्यात मिळुन आलेल्या दुचाकी गाडीचे आर.टी.ओ. नंबरवरुन माहिती काढली व गुन्हे अभिलेखावरील अभिलेख पाहता सदर दुचाकी गाडीबाबत बंडगार्डन पोलीस स्टेशन, गुन्हा रजि नं ३५७/२०२४, भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंद असलेबाबत माहिती समजल्याने नमुद आरोपीकडे अधिक चौकशी करता त्याने आणखीन ०१ दुचाकी गाडी चोरी केल्याचे सांगितल्याने नमुद आरोपीकडुन एकुण ०२ वाहनचोरीचे गुन्हे उघडकीस आणले आहेत.

१) बंडगार्डन पोलीस स्टेशन, पुणे शहर गुन्हा रजि.नं. ३५७/२०२४, भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२)
२) बंडगार्डन पोलीस स्टेशन, पुणे शहर, गुन्हा रजि नं. २३७/२०२४, भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२)

वरील नमुद आरोपीकडुन पुणे शहरचे एकुण ०२ वाहनचोरीचे गुन्हे उघडकीस आणुन त्याचेकडुन किं रु ५०,०००/- चा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

सदरची कारवाई मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री. शैलेश बलकवडे, मा.पोलीस उप आयुक्त (गुन्हे) श्री निखिल पिंगळे, मा.सहा.पोलीस आयुक्त श्री. गणेश इंगळे, गुन्हे शाखा १, पुणे शहर व दरोडा व वाहनचोरी विरोधी पथक-१, चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. नंदकुमार बिडवई यांचे मार्गदर्शनाखाली सहा.पो.निरी. प्रविण काळुखे पोलीस अंमलदार, बाळु गायकवाड, प्रदीप राठोड, गणेश ढगे, अजित शिंदे, दत्तात्रय पवार, रविंद्र लोखंडे, साईकुमार कारके, श्रीकांत दगडे, शिवाजी सातपुते, अमित गद्रे, नारायण बनकर, यांनी केली आहे.


पुणे शहर पोलीस
दरोडा व वाहनचोरी विरोधी पथक १